प्रतिबंधात्मक
20-4-2018

शा.म.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-ए ३-ब्रि (वाय) ३५६

FORM - IA N.C.R.B.

I.I.F. 06

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1 राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ए.सी.बी. पहिली खबर क्र. FIR No. १५ वर्ष Year २०१८ दिनांक Date २०/०४/२०१८

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम १९८८ कलमे Sections ७, १३(१)(ड) सह १३(२)
(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार ........ तारीख पासून फेब्रुवारी २०१८ पासून वेळ ........ तारीख पर्यंत १८/०४/२०१८ वेळ ........
Occurence of offence : Day Date from Time Date to Time

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)
3. (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेची तारीख Date १८/०४/२०१८ Time १०.३० वा.
Information received at P. S.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ........ तारीख २०/४/२०१८ वेळ ........
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव जल अभियंता विभाग, कार्यकारी अभियंता, परिरक्षण जलमापक कार्यशाळा, मन.एम.जोशी मार्ग, भायखळा, मुंबई ११ ठिकाणाचा नंबर ........ गल्ली ........ रस्त्याचे नाव ........
Address of Occurence Name No. if any Ward Name of road

जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ तालुका........ जिल्हा ........ राज्य ........
Nearest Adentifiable Place Village Post Taluka Dist. State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........ तालुका........ जिल्हा ........ राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address

(a) नाव Name श्री. मनोज बाबुस (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name शंकरराव बाबुस

(c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age ४६ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ........

(e) पारपत्र क्रमांक Passport No. — दिल्याचा दिनांक Date of Issue — दिल्याचे ठिकाण Place of Issue — (f) व्यवसाय Occupation कॉन्ट्रॅक्टर

(g) धर्म Religion हिन्दू जात Caste जनजात Sub-Caste

(h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. ........ घर/नाव नंबर ........ फोन/मो. नंबर ........ पॅन नं. ........ ओटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव अंकुश नगर, चऱ्हाटा रोड, मु.पो. बीड, ता. जि. बीड. जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ पो.स्टे ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.

तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

प्रमोद दिनकर भोसले, वय ५० वर्षे, धंदा नोकरी (सहाय्यक अभियंता) प्रमुख अभियंता यांत्रिकी व विद्युत यांचे कार्यालय, आर.एस. निमकर मार्ग भायखळा (प) मुं. ८ रा. ठि. फ्लॅट नं ३४, गुरुदेव प्रतिमा, इंद्रप्रस्थ पार्क, म्हैसूर पूर्व,

फिर्यादी श्री. मनोज शंकरराव बाभ्रस, यांचा स्वतंत्र पानावर संगणकावर संगणकीकृत केलेला मराठी भाषेतील सविस्तर जबाब सोबत जोडण्यात आला असून तोच या गुन्ह्यातील प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(signature) 20/04/18

(विजयकुमार डोके)

पोलीस निरीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(signature) 20/04/2018

फिर्याद दिनांक २०/०४/२०१८

श्री. मनोज शंकरराव बाब्रस, वय ४६ वर्षे, धंदा–व्यवसाय ( कॉन्ट्रक्टर ), रा.ठि.अंकुश नगर च–हाटा रोड, मु. पो. बीड, ता. जि. बीड, राज्य महाराष्ट्र मो.नं. ९६२३०५१९०३

-----ooo-----

मी वर नमूद केल्याप्रमाणे असून नमूद ठिकाणी माझी पत्नी माझे आई वडील तसेच मुले यांच्या समवेत गेल्या २० वर्षापासुन राहण्यास आहे. माझी सन २००३ पासुन ओंकार शॉपी स्वामी समर्थ मंदिरा समोर स्टेडियम कॉम्प्लेक्स बीड –४३११२२ येथे फ्लेक्स प्रिंटींग, चार्ट, मॉडेल, व्हिनायल कटींग, ऑफसेट प्रिंटिंग प्लास्टीक मोल्डींग फर्निचर शैक्षणिक खेळणी ट्रेडीगचे दुकान आहे. मी महानगरपालिकेच्या वेबसाईटवर जावून तेथे आलेली वॉटर प्युरीफायर सप्लाय व परिरक्षण बाबत ई–निविदाची जाहिरात इंटरनेटच्या माध्यमातुन पाहिली सदरची निविदा ही मुंबईकरीता असल्यामुळे मी मुंबई येथे येवून इंटरनेटच्या माध्यमातुन ई–निविदा सन २०१२ साली भरली त्यावेळी मी प्रथम माकेटींग कंपनीचे अॅक्वाझेन मॉडेल देण्याचे ई–निविदेमध्ये नमुद केले होते. त्याबाबतचा इ.एम.डी. रु.३,०६,८६०/– रक्कमेचा डी.डी. महानगरपालिकेचे कार्यालय एम.अन्ड ई डिपार्टमेंन्ट निमकर मार्ग, नागपाडा, मुंबई ८, याठिकाणी जमा केला होता. त्यानंतर मला साधारण एक महिन्यानंतर कार्यकारी अभियंता महानगरपालिकेचे कार्यालय एम.अन्ड ई डिपार्टमेंन्ट निमकर मार्ग, नागपाडा, मुंबई ८ या कार्यालयाने मला दुरध्वनी वर संपर्क साधुन ई–निविदा बाबत निगोशियेशन करीता डेप्युटी म्युनिसिपल कमीशनर (शिक्षण), महानगरपालिका कार्यालय, परेल एफ–दक्षिण, मुंबई याठिकाणी बोलविले. तेथील उपस्थितीत सर्व निविदाधारक यांच्या मध्ये एल–१ करीता माझ्या ओंकार शॉपी या कंपनीची निवड झाली.

सन २०१३ साली मला कार्यकारी अभियंता महानगरपालिकेचे कार्यालय एम.अन्ड ई डिपार्टमेंन्ट निमकर मार्ग, नागपाडा, मुंबई ८ या कार्यालयातुन मुंबई महानगरपालिकेच्या विविध शाळेमध्ये वॉटर प्युरीफायर बसविण्याच्या वर्क ऑर्डर मिळाल्या. त्याप्रमाणे मी त्या त्या शाळेत जावून प्रथम मार्केटींग कंपनीचे अॅक्वाझेन मॉडेल असलेले वॉटर प्युरीफायर सन २०१४ साली बसविण्यात आल्या. त्यानंतर नमुद कार्यालयाने १७४ अॅक्वाझेन मॉडेल असलेले वॉटर प्युरीफायर सन २०१४ मध्ये बसविण्यात सांगितले. त्यापैकी २८ अॅक्वाझेन मॉडेल असलेले वॉटर प्युरीफायर कोठे बसविण्याबाबत कोणताही आदेश प्राप्त न झाल्याने हिंदू कॉलनीतील शिक्षण अधिकारी यांचे कार्यालयाच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. मी वॉटर प्युरीफायर मशीन बसविल्या बाबत सबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाकडून पोहोच घेतल्या. सन २०१३–२०१४ च्या पोहोच पावत्या व कामाच्या रक्कमेची वेगवेगळी बिले मी कार्यकारी अभियंता महानगरपालिकेचे कार्यालय एम.अन्ड ई डिपार्टमेंन्ट निमकर मार्ग, नागपाडा, मुंबई ८ या कार्यालयात सादर केली होती.

वरील कामाच्या बिलाची रक्कम रु.१,७९,००,०००/–सन २०१४ साली बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खात्यातुन माझ्या स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा बीड, खाते क्र. ३१६२७१०१२२५ या खात्यावर जमा झाली. सदर रक्कमेचे बिल काढून दिले म्हणून एम अॅन्ड ई कार्यालयातील लोकसेवक प्रमोद भोसले, सहा.अभियंता यांनी माझ्या कडे सन २०१४ मध्ये रु.६,००,०००/– एवढया रक्कमेची लाचेची मागणी केली होती. त्यापैकी सन २०१४ मध्येच रु. ३,००,०००/– इतकी रक्कम लोकसेवक प्रमोद भोसले यांनी रोख स्वरुपात घेतली आहे. उर्वरीत रु. ३,००,०००/– एवढया रक्कमेसाठी मागील दोन महिन्यापासुन लोकसेवक भोसले यांनी माझ्याकडे तगादा लावला होता. तसेच उपरोक्त रु. १,७९,००,०००/– या रक्कमे व्यतिरिक्त रु.१,३०,३२१.६०/– एवढी रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून येणे बाकी आहे. रु.१,३०,३२१.६०/– रक्कमेचे बिल काढून देण्यासाठी व पूर्वी मंजूर करुन दिलेल्या बिलाचा मोबदला म्हणून माझ्याकडे लोकसेवक भोसले यांनी रु.३,००,०००/– एवढया लाचेची मागणी केली. लोकसेवक प्रमोद भोसले, सहा. अभियंता यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक १८/०४/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहुन पोलीस निरीक्षक श्री. विजयकुमार डोके यांच्याकडे माझे स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली.

त्याप्रमाणे दिनांक १८/०४/२०१८ रोजी माझ्या तक्रारीची पडताळणी दोन शासकीय पंचासमक्ष केली. सदर पडताळणी मध्ये लोकसेवक भोसले यांनी दिनांक १९/०४/२०१८ रोजी भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे दिनांक १९/०४/२०१८ रोजी पुन्हा शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान लोकसेवक भोसले यांनी रुपये सहा लाख रक्कमे पैकी रुपये तीन लाख मिळाल्याचे मान्य केले. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मला

येणे बाकी असलेले रुपये १,३०,३२१.६०/– एवढया रक्कमेचे बिल मंजूर करण्याकरीता माझ्याकडे उर्वरीत रुपये तीन लाखाची मागणी केली. माझ्याकडे एवढी रक्कम नसल्याने मी रुपये पन्नास हजार रक्कमेची जुळवणी करुन लोकसेवक भोसले यांना भेटावयास त्यांच्या कार्यालयात गेलो असता ते मिळून आले नाही म्हणून मी त्यांना फोन केला असता त्यांनी मला भायखळा रेल्वे स्टेशन (प) समोर भेटायला बोलविले. म्हणून मी माझ्या गाडीसह सदर ठिकाणी गेलो असता लोकसेवक भोसले हे माझ्या इनोव्हा गाडी क्र.एमएच–२३–वाय–०००४ या गाडीत येवून बसले. तेथे चर्चे दरम्यान लोकसेवक भोसले यांनी लाचेची रक्कम रु. ५०,०००/–स्विकारताना " अरे एक तरी करायची ना राऊंड" असे म्हटले त्यावर मी आता पन्नास हजार आणलेत देवू का असे विचारले तेव्हा लोकसेवक भोसले यांनी "दया" असे म्हणून सदर लाचेची रक्कम रु.५०,०००/–लोकसेवक भोसले यांनी डाव्या हाताने स्विकारुन ती परिधान केलेल्या पॅन्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. परंतु त्याना त्यावेळी काही शंका येत असल्याने सदर रक्कम त्यांनी गाडीमधील बसण्याच्या मॅट वर ठेवली. त्यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबईच्या अधिकारी यांनी त्यांना गाडीतच रंगेहाथ पकडले.

वरील नमुद दि. १८/०४/२०१८ रोजीची पडताळणी तसेच दि. १९/०४/२०१८ रोजीच्या पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान माझे लोकसेवक भोसले यांचेशी झालेले संभाषण मला लावलेल्या डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधे ध्वनिमुद्रित करण्यात आले आहे.

तरी लोकसेवक प्रमोद भोसले यांच्याशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्या–घेण्याचे व्यवहार नाहीत. तसेचं लोकसेवक प्रमोद भोसले यांना देण्याकरीता आणलेली लाचेची रक्कम ही मी माझे बचतीतुन आणलेली आहे. तरी लोकसेवक भोसले यांनी स्वत:करीता रू. ३,००,०००/– इतक्या लाचेची मागणी केली व स्विकारण्याचे मान्य करुन रु.५०,०००/– रक्कम दिनांक १९/०४/२०१८ रोजी स्विकारली म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द् कायदेशिर फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत करुन तो मी वाचुन पाहिला असता तो मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

[signature] 20/04/18

( विजयकुमार डोके )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

[signature]

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे तक्रारदाराने तक्रार दिल्यानंतर सापळा
Records for delay in reporting by the Complainant/informant कारवाई नंतर गुन्हा दाखल.

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मा.त्मत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य लाचेची रक्कम रु. ५०,०००/-
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties) लाचेची रक्कम रु. ५०,०००/-

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमूद तारीख वेळी व ठिकाणी आलोसे प्रमोद दिनकर भोसले, सहाय्यक अभियंता प्रमुख अभियंता यांत्रिकी व विद्युत यांचे कार्यालय बृ.म.न.पा. भायखळा मुंबई यांनी श्री. मनोज शंकरराव ढवळे यांच्याकडे त्यांनी बृ.म.न.पा. ला केलेल्या पुरविलेल्या वॉटर प्युरीफायर मशिनचे रु.१,७८,००,०००/- बील मंजूर करून दिले व रु.१,३०,३२१.६०/- एवढे बील काढून देण्यासाठी मोबदला व प्रलोभन म्हणून कायदेशीर पारिश्रमिका शिवाय परितोषण म्हणून स्वतः साठी रु. तीन लाख मागणी करून रु.५०,०००/- दि.१०/४/२०१८ रोजी स्विकारले म्हणून भ्र.प्र. अधिनियम १९८८ क. ७, १३(१)(ड) सह क. १३(२) अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही .— 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा पोलीस निरीक्षक विजयकुमार डोके

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण.

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............ जिल्हा ............ राज्य ............

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) ............ Rank ............ No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............ (3) Transferred to P. S. ............ District ............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचं त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

20/04/18
पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name विजयकुमार डोके
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting ला.प्र.वि. मुंबई.
Coding No. of I. O. ............

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ............
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.